**दिनांक - 11 / 12 / 24**
**विषय - संस्थेच्या पुनर्निर्माण प्रक्रिये ची पुढील वाटचाल.**

प्रिय सभासद बंधू भगिनींनो,

मागील काही दिवसांपासून संस्थे चे बरेच सभासद व्हॉट्स ॲप वर, पंच समिती सदस्यांना फोन करून तसेच प्रत्यक्ष भेटून आपल्या पुनर्निर्माण प्रकल्पा ची पुढील वाटचाल कशी होत आहे तसेच घरं रिकामी करण्यास किती वेळ लागेल अशी पृच्छा करीत आहेत.

ह्या संबंधात आपले सल्लागार आणि बिल्डर शी सखोल चर्चा केल्या नंतर असे लक्षात येते की बिल्डर आणि संस्था यांच्याशी संबंधित डेव्हलपमेंट एग्रीमेंट आणि पॉवर ऑफ अटॉरनी तसेच फ्लॅट्स / डुप्लेक्स चे एलोटमेंट सारख्या बाबी जानेवारी 25 आखेर पर्यंत पूर्ण होतील.

डी ए च्या ड्राफ्ट वर, जो बिल्डर कडून आपल्या कडे आला होता, त्यावर आपल्या विधी सल्लागार आणि पंच समितीत दोन दा सखोल चर्चा झाली. आपल्या तर्फे सांगण्यात आलेले मुद्दे ध्यान्यात घेऊन नुकताच तो ड्राफ्ट बिल्डर कडे पाठविण्यात आला आहे जो पुढील 8 / 10 दिवसात त्यांच्या लीगल टीम कडून आपल्या कडे परत पाठविण्यात येईल. एकदा हा ड्राफ्ट फायनल झाला की तो आपल्या सभासदां समोर त्यांच्या माहिती आणि सूचनांसाठी ठेवण्यात येईल. हा ड्राफ्ट तसेच पॉवर ऑफ अटॉरनी चे ड्राफ्ट आपल्या सर्व साधारण सभेत पास झाल्यावरच ह्यावर सह्या होतील.

आता फ्लॅट्स आणि डुप्लेक्स चे डिझाईन्स जवळपास फायनल झाले आहेत. काही सभासदांच्या निर्णयात उशीर झाल्या मुले ह्या प्रक्रियेत उशीर झाला. आता हे डिझाईन्स fier fighting department कडे पाठविण्यात येत आहेत.

ह्या नंतर लगेचच फ्लॅट एलोटमेंट ची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल आणि त्या नंतर डी ए agreement वर सह्या करण्यात येतील.

वरील सर्व बाबी आपल्या आणि बिल्डर च्या मधल्या आहेत पण ह्या पुढील बऱ्याचश्या गोष्टी कॉर्पोरेशन आणि सरकार शी संबंधित आहेत. त्या पूर्ण होण्यात किती वेळ लागेल ते नक्की असे सांगता येत नाही. कॉर्पोरेशन कडून अपेक्षित क्लिअरन्स, एडज्युडीकेशन, पर्यावरण विभागाची मंजुरी, ज्यात चार / पांच महिने

ही लागू शकतात. ह्या गोष्टींचा विचार केल्यास जागा सोडायला जुलै / ऑगस्ट उजाडेल असे आज तरी वाटते. घरं सोडण्या साठी 60 दिवस आधी नोटीस देण्यात येईल.

कृपया हे लक्षात घ्या की हे सगळे टाईम टेबल tentative असे आहे. त्यामुळे सभासदांना विनंती की त्यांनी त्यांचे सर्व नियोजन वरील टाईम फ्रेम लक्षात घेऊन करावे.

धन्यवाद,
प्रदीप नेवाळकर
पंच समितीच्यावतीने